# ब्राह्मणेत्तर चळवळीत शाहू महाराजांचे योगदान

**नवनाथ लक्ष्मण गायकवाड, संशोधक विद्यार्थी, राज्यशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर**

---

**प्रस्तावना :**

आधुनिक भारताच्या इतिहासात राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, बदलाच्या दृष्टीने एकोणिसावे शतक अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. या काळात पारंपरिक भारतीय समाजव्यवस्था, धर्मग्रंथ, परंपरा, शिक्षण वगैरेंची मूलगामी चिकित्सा होऊ लागली. पाश्चात्त्य ज्ञान-विज्ञानाच्या प्रकाशात जीवनाच्या पुनर्मांडणीचे प्रयत्न होऊ लागले. व्यक्तिगत व संघटनात्मक पातळीवर समाजसुधारणा व धर्मचिकित्सेचे प्रयत्न होत होते. यालाच 'भारतीय प्रबोधनकाळ' असे म्हणतात. यावेळी म.फुले यांची सत्यशोधक चळवळ ही खेड्यापाड्यात पोहचवली. या परंपरेला प्रत्यक्ष राजर्षी शाहू महाराज यांचे सहकार्य लाभले आणि त्यांनी सत्यशोधक समाजाच्या प्रसाराला वाहून घेताना विद्येचा प्रसार करण्यास प्राधान्य दिले. तसेच कर्मवीर भाऊराव पाटील, भास्करराव जाधव, मुकुंदराव पाटील, जेधे, जवळकर, मोरे यासारखे नेतृत्व निर्माण केले.

**शाहू महाराज व ब्राह्मणेत्तर चळवळीच्या आधीची पार्श्वभूमी :**

शाहू महाराजांनी राज्यकारभाराचे उद्दिष्ट स्पष्ट केले होते. "आमचे प्रजाजन सदा सुखी व संतुष्ट असावे, त्यांच्या हितसंबंधाची एकसारखी अभिवृद्धी होत जावी व आमच्या संस्थानचा सर्व बाजूंनी अभ्युदय व्हावा अशी आमची उत्कट इच्छा आहे." [१] त्या दृष्टीने प्रगतिशील राज्यकारभारासाठी आणि बहुजन समाजाच्या उद्धाराच्या हेतूने अनेक परिणामकारक राजकीय प्रशासकीय सुधारणांना सुरूवात शाहू महाराज यांनी केलेली दिसून येते. त्यांनी ब्राह्मणांचे प्रशासन मंडळातील वर्चस्व कमी करण्याचा प्रयत्न केला. त्यात हुजूर ऑफिसच्या निर्मितीने ब्राह्मण वर्चस्वाला धक्का दिला. प्रशासनातील अल्पसंख्याक ब्राह्मण उच्चवर्णीयांची मक्तेदारी मोडून काढण्यासाठी शिक्षणप्रसार व बहुजन समाजातील साक्षरांना संस्थांच्या सेवेत प्राधान्य देण्याचे शाहू महाराजांनी ठरविले. त्यांनी ब्राह्मणेत्तर वर्गातून भरती करण्यास सुरुवात केली परिणाम प्रशासनातील ब्राह्मणांची मक्तेदारी कमी होऊन ब्राह्मणेत्तरांची संख्या मोठया प्रमाणात वाढत गेली. याच वेळी वेदोक्त प्रकरण शाहू छत्रपतींच्या जीवनात तसेच महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासातही फार महत्त्वाचे स्थान आहे. सन १८९९ मध्ये निर्माण झालेल्या वेदोक्त प्रकरणामुळे सामाजिक संघर्षातून पुढे ब्राह्मण-ब्राह्मणेत्तर वादाला तोंड फुटले. त्यांच्या जीवन व कार्याला वळण पारपत झाले. यातूनच शाहू महाराज व सत्यशोधक समाजाची पुनर्स्थापना केली. यातूनच पुढे ब्राह्मणेत्तर चळवळ निर्माण झाली.

**राजर्षी शाहू महाराज व ब्राह्मणेत्तर चळवळ:-**

महाराष्ट्राच्या इतिहासातील ब्राह्मणेत्तर चळवळीचे प्रकटीकरण १९१७ च्या सुमारास झाले. महाराष्ट्रातील ब्राह्मणेत्तर चळवळीचा प्रमुख पाठीराखा म्हणून छत्रपती शाहू महाराजांकडे पाहिले जाते. या चळवळीच्या प्रकटीकरणाच्या वेळी तिचे स्वरूप ब्राह्मणेत्तरांच्या राजकीय हक्कांच्या मागणीसाठी सुरू केलेली चळवळ असे भासत असले तरी तिची बीजे महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीत व शाहू महाराजांच्या वेदोक्त चळवळीत पेरली गेली होती. ब्राह्मणशाहीच्या सर्वकष जुलमी सत्तेविरूद्ध संघर्ष करणारी सत्यशोधकांची चळवळ ही महाराष्ट्रातील ब्राह्मणेत्तरांची पहिली चळवळ होती, तर शाहू महाराजांनी सुरू केलेली वेदोक्ताची चळवळ ही ब्राह्मणशाहीच्या मक्तेदारीविरुद्ध व अन्यायाविरुद्ध सुरू केलेली ब्राह्मणेत्तरांची दुसरी चळवळ होती. शाहू महाराज यांच्या वेदोक्त चळवळीबरोबर महात्मा फुलेंच्या सत्यशोधक चळवळीचेही पुनरुज्जीवन करून १९१७ मध्ये प्रकट झालेल्या ब्राह्मणेत्तर चळवळीची पार्श्वभूमी तयार करून ठेवली.[२]

तत्कालीन परिस्थितीची मर्यादा म्हणून शाहू महाराजांचा राजकीय ब्राह्मणेत्तर चळवळीतील सहभाग अप्रत्यक्ष असला तरी खऱ्या अर्थाने या चळवळीची धुरा त्यांच्याच खांद्यावर होती, तेच या चळवळीचे सर्वमान्य नेते व प्रमख आधारस्तंभ होते. १९१७ च्या डिसेंबरमध्ये त्यांनी माँटेग्यू यांची भेट घेऊन मागास जातींचे म्हणणे व त्यांना स्वतंत्र प्रतिनिधि देण्याची आवश्यकता समजावून सांगितली. अस्पृश्यांपर्यंतच्या सर्व वर्गांना आणि विशेषत: अस्पृश्यांना स्वतंत्र प्रतिनिधी जरूर आहेत असे त्यांनी या वेळी सांगितले. तसेच नंतरही अगदी अखेरपर्यंत राजर्षी ब्राह्मणेत्तर पक्षाचे म्हणणे सरकार, वरिष्ठ अधिकारी वर्ग व आपल्या वजनदार मित्रमंडळीपुढे निर्भीडपणे व चिकाटीने मांडीत होते.[३]

राजर्षी शाहू महाराज व ब्राह्मणेत्तरांना 'स्वराज्य' नको होते असे नव्हे तर ते हवेच होते. याबाबत टिळक स्वत: म्हणतात, "ब्राह्मणेत्तरांना स्वराज्य नको असे नाही.[४] यावरून ब्राह्मण राष्ट्रवाद्यांची राजर्षी स्वराज्यद्रोही आहेत ही ओरड किती पूर्वग्रहदूषित व खोटारडी होती हे स्पष्ट होते. राजर्षींनी त्यांना अपेक्षित स्वराज्य पक्ष स्पष्ट केला आहे. ते म्हणतात, "जातिभेदापासून होणारे अनिष्ट परिणाम नाहीसे होईतोपर्यंत हल्लीच्या प्रसंगी आपणास ब्रिटिश सरकारचा आश्रय व मार्गदर्शकता यांची जरूरी आहे. केवळ अल्पसंख्य उच्चवर्गीयांच्या हातातच सत्ता जाण्यात स्वराज्याचे पर्यवसान होऊ नये म्हणून निदान दहा वर्षां पर्यंत तरी आम्हाला जातवार प्रतिनिधी निवडून देण्याचा हक्क असला पाहिजे. यामुळे आमचे हक्क काय आहेत याचे आम्हाला शिक्षण मिळेल. एकवार ते आम्हाला समजले म्हणजे प्रतिनिधित्वाची जरूरी राहणार नाही. जातवार प्रतिनिधी देण्याचा हक्क नसल्याने काय अवस्था होते याबाबत आमच्या म्युनिसिपालटीचा शोचनीय अनुभव आम्हापुढे आहेच".[५] शाहू महाराजांनी गेल्या दोन शतकांपासून ब्राह्मणांच्या राजकीय, सामाजिक व विशेषत्त्वाने धार्मिक अधिपत्याखाली चिरडल्या गेलेल्या मराठ्यांना स्वत:च्या पायावर सक्षमपणे उभे राहीपर्यंत तरी व अनिष्ठ असला तरी स्वतंत्र मतदारसंघ देण्याची माँटेग्यूकडे मागणी करून सत्ता जर मूठभर उच्चवर्णीय व स्वार्थी लोकांच्या हाती गेली तर मतदानाचा हक्क मर्यादित असल्याने ते बहुजन समाजाला कायम गुलामगिरीत ठेवतील असे मत मांडले.[६] तसेच "सरकारने विधीमंडळावर काही प्रतिनिधींची नियुक्ती करावी या तत्त्वाला राजर्षींचा विरोध होता, कारण सरकार नियुक्त सभासद कितीही स्वार्थनिरपेक्ष बुद्धीने काम करणारा असो, तो सरकार नियुक्त आहे त्याच कारणामुळे त्याच्या मताची किंमत कमी होते."[७] असे शाहू महाराजांचे मत होते. यावरून राजर्षी ब्राह्मणेत्तरांच्या व विशेषत: दलित, अस्पृश्यांच्या राजकीय हक्कांबाबत किती आग्रही होते हे स्पष्ट होते.

ब्राह्मणेत्तर चळवळीतील शाहू महाराजांचे एक वैशिष्ट्यपूर्ण योगदान म्हणजे त्यांनी ब्राह्मणेत्तर वृत्तपत्रांना दिलेले सक्रिय उत्तेजन हे होय. वृत्तपत्रांच्या क्षेत्रात आतापर्यंत ब्राह्मण वर्गाचीच मक्तेदारी होती व बहुतेक सर्व ब्राह्मणी वृत्तपत्रे ब्राह्मणांच्या हिताची जपणूक करणारीच होती. एवढेच नव्हे तर कोल्हापूर संस्थानच्या कारभारावर पूर्वग्रहदूषित व जातीविशिष्ट दृष्टिकोनातून प्रखर हल्ले करण्याचे व्रत ती इमाने इतबारे चालवीत होती, अशा परिस्थितीत ब्राह्मणेत्तर पक्षाची बाजू समर्थपणे मांडणारी वृत्तपत्रे चोहीकडे काढली जावीत यासाठी राजर्षी प्रयत्नशील होते.याचबरोबर शाहूंनी 'जागरुक', 'संजीवन', 'सत्यप्रकाश', 'राष्ट्रवीर', 'प्रबोधन' पत्रांनाही आर्थिक मदत केली

शाहू महाराजांचा ब्राह्मणेत्तर चळवळींतील योगदानाचा दुसरा प्रमुख पैलू म्हणजे त्यांनी मद्रासकडील ब्राह्मणेत्तर चळवळीशी साधलेला संपर्क व तिच्या नेत्यांशी केलेले विचारांचे आदान-प्रदान होय. शाहू महाराजांच्या १९१९ ते १९२१ या कालखंडात मद्रासच्या ब्राह्मणेत्तर चळवळीचे डॉ. माधवन नायर, सर पी. त्यागराज चेटी, सी. नटेश मुदलियार, सर शंकरन नायर आदी नेत्यांशी घनिष्ठ संबंध प्रस्थापित झाले होते.[८]

शाहू महाराजांचा बहुजन समाजाला न्याय्य हक्क मिळविण्यासाठी त्यांचा झगडा होता. गरजू, गरीब व दलित व बहुजन समाजाला मानवी मूलभूत हक्क मिळवून त्यांना स्वराज्याला पात्र ठरविणे, हीच खरी राजर्षी शाहू महाराजांची स्वराज्याबद्दलची वास्तववादी कल्पना होती व त्यासाठीच त्यांचा झगडा होता. एवढेच नव्हे तर दुसऱ्या बाजूने बहुजन समाजात शिक्षण प्रसार करणे व सामाजिक व धार्मिक गुलामगिरीतून बहुजन समाजाची मुक्तता करणे तसेच सरकारच्या राज्यकारभारात बहुजन समाजाला राजकीय हक्क मिळवून देणे या गोष्टींची आवश्यकता बहुजन समाज सुधारणेच्या दृष्टीने जास्त भासू लागली होती. त्यांचाही परामर्श लेखकाने या ठिकाणी घेऊन भारताच्या दक्षिणेला पसरलेली ही ब्राह्मणेतर चळवळ म्हणजे एक मोठा पक्षच झाला होता. एवढेच नव्हे तर सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक क्रांती प्रथम समान मानवतावादी भूमिकेतून करणे व स्वराज्याचा पाया भक्कम करणे, हाच हेतू राजर्षी शाहू महाराजांचा होता. याबाबतीत त्यांची वाटचाल खंबीर होती, तसेच पुढे पुढे समान संधीसाठी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक हक्क बहुजन समाजाला मिळवून देणे हे या चळवळीचे सामाजिक सूत्र बनले आहे. १९१७ पासून ही वाटचाल सुरू झाली. या चळवळीच्या प्रचारासाठी वृत्तपत्रे निघाली. त्यांना शाहू महाराजांनी सढळ हाताने मदत केली. याविषयीची बरीचशी उदाहरणे देऊन २७ जुलै १९२० च्या दरम्यान हुबळी येथे भरलेल्या ब्राह्मणेतर सामाजिक परिषदेचे अध्यक्षस्थान महाराजांनी स्वीकारले. सर त्यागराज चेट्टी यांच्या अध्यक्षतेखाली एक प्रचंड राजकीय ब्राह्मणेतर परिषदही याच वेळी व त्याच ठिकाणी भरली होती. नवीन माँटफर्ड सुधारणा हक्काप्रमाणे कौन्सिलच्या निवडणुकाही त्या वेळी जवळ आल्या होत्या, म्हणूनच ब्राह्मणेतरांना या परिषदेचे फार महत्त्व वाटत होते. महाराज या वेळी राजकीय परिषदेस हजर राहिले व त्यांनी सामाजिक परिषदेचे अध्यक्षस्थान स्वीकारले असा

उल्लेख आहे. याशिवाय या चळवळीला दुफळीचे ग्रहण लागताना महाराज या चळवळीमध्ये एकी करण्याचा प्रयत्न करीत राहिले. दुसऱ्या बाजूने महाराजांना बदनाम करण्याचे डाव चालूच होते. एवढेच नव्हे तर हुबळीच्या परिषदेत महाराजांनी भाग घेऊ नये म्हणून विरोधकांनी जोरात प्रयत्न केले होते, आपल्या संस्थानात सामाजिक, धार्मिक क्रांती करतानाही १९१९ मध्ये राजकीय सुधारणांचे हक्क मिळाल्यानंतर या सुधारणा राबवाव्यात व या सुधारणांप्रमाणे कायदे मंडळावर बहुजन समाजातले पुढारी निवडून जावेत असे त्यांना वाटू लागले. म्हणून त्यांनी राजकीय ब्राह्मणेत्तर चळवळीमधून हाच प्रसार केला असे दाखवून दिले आहे.[८] शाहू महाराजाच्या प्रेरणेने ब्राह्मणेत्तरांची राजकीय चळवळ उदयास आली व ब्राह्मणेत्तर पक्षाची स्थापना झाली.

**समारोप :**

राजर्षी शाहू यांनी ब्राह्मणेत्तर चळवळीला उत्साहपूर्ण योगदान दिले. ते ठामपणे असा विश्वास बाळगत होते, की जोपर्यंत भारतामधील सर्व जनता अर्थातच स्त्री आणि पुरुष सुशिक्षित होत नाहीत तोपर्यंत राष्ट्र कधीही स्वतंत्र, एकात्म आणि बलवान होणार नाही. राजर्षी शाहू यांच्यावर म. फुले यांच्या तसेच हिंदूमधल्या विविध सुधारणांच्या चळवळींचा प्रभाव होता. त्यांनी ब्राह्मणेत्तर चळवळीला राजकीय स्वरूप प्राप्त करून दिले. कारण राजकारण आणि समाजकारण ही परस्परांवर अवलंबून असणारी तसेच परस्परांवर प्रभाव टाकणारी क्षेत्रे असतात. राजकारणात प्रभावी असणारी शक्ती समाजकारणावरही आपली सत्ता गाजवू शकते. राजकीय सत्तेच्या माध्यमातून समाजपरिवर्तन घडवून आणता येते. ज्याला समाजकारण करायचे त्याला राजकारणाकडे दुर्लक्ष करून चालत नाही. या सूत्रास अनुलक्षूनच ब्राह्मणेत्तरांची राजकीय चळवळ या सुमारास उदयास आली.

संदर्भसूची :

१. लठठे आ.बा., (१९२५) "श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र", बेळगाव,पृ.क्र. ७४,७५
२. पवार जयसिंगराव,(२००१), "राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ",महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर. पृ.क्र. १६४
३. लठठे आ.बा., (१९२५) "श्रीमच्छत्रपति शाहू महाराज यांचे चरित्र", बेळगाव,पृ.क्र. ४५२
४. भोसले, एस.एस. (संपा.) (१९७५), " राजर्षी शाहू : काळ व विचार आणि कार्य" जिल्हा परिषद कोल्हापूर, प्रस्तुत ग्रंथात छत्रपती राजर्षी शाहूंच्या संदर्भात ३७ लेखांचा समावेश आहे . पृ.क्र. ३०७
५. भोसले, एस.एस. (संपा.) (१९७५), " राजर्षी शाहू : काळ व विचार आणि कार्य" जिल्हा परिषद कोल्हापूर, प्रस्तुत ग्रंथात छत्रपती राजर्षी शाहूंच्या संदर्भात ३७ लेखांचा समावेश आहे . पृ.क्र. ३०७
६. किर धनजंय, (१९९२), " राजर्षी शाहू छत्रपती-एक समाजक्रांतिकारक राजा", पॉप्यूलर प्रकाशन, मुंबई, पृ.क्र. ३५२
७. पवार जयसिंगराव,(२००१), "राजर्षी शाहू स्मारक ग्रंथ",महाराष्ट्र इतिहास प्रबोधिनी, कोल्हापूर. पृ.क्र. १९६
८. नाईक तु.बा, (पुनर्मुद्रण २००५) , "छत्रपती राजश्री शाहू महारज", कोल्हापूर पृ.क्र. ७२